बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ३३२ ▪ सोमवार, दि. १३ एप्रिल, २०२६ ▪ पोस्टल दिनांक १४ एप्रिल, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-332 ▪ Monday 13 April, 2026 ▪ Postal Date 14 April, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

# सरकारने ६२ रु. लिटर ने रॉकेल देऊन एवढेमोठे उपकार करू नये, इतके महाग रॉकेल घेऊन जनता उपकार कुठे फेडेल

सायं.दैनिक
www.beedkisan.in
बीड किसान
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

**बीड । किसान न्युज**

**युद्धजन्य परिस्थितीत स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर राज्य सरकारने रेशन कार्ड धारकांना रॉकेल देण्याचा निर्णय घेतला आहे. याचा कोटाही निश्चित झाला आहे. पण अद्याप पर्यंत रॉकेल वाटप झाले नाही. रॉकेल चे दर ६२ रुपये ठरविण्यात आले आहे. यामुळे मायबाप सरकारला लोकांना दिलासा द्यायचा की,नफा कमवायचा आहे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अडचणीच्या काळात सरकार नफा खोरीचा प्रयत्न करण्यात येत आहे का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**



गॅस टंचाई कमी करण्यासाठी केंद्र शासनाने रेशनकार्ड धारकांना रॉकेल वितरणाचा निर्णय घेतला आहे. याची जोरदार चर्चा सुरू असून केंद्र सरकारने राज्यात रॉकेल शिधापत्रिकांच्या माध्यमातून देण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यासाठी ३७ लाख ४४ हजार लिटरचा कोटा निश्चित केला आहे. त्यानुसार अंत्योदय व प्राधान्य योजनेतील लाभार्थ्यांना या रॉकेलची वितरण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्ष मिळालेला कोटा अत्यल्प असल्याने केवळ अंत्योदय शिधापत्रिकाधारकांनाच याचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच नगरपालिका क्षेत्र वगळण्यात आले असल्याने केवळ ग्रामीण भागातील नागरिकांना याचा लाभ मिळणार आहे. तसेच पूर्वी हे रॉकेल २० रुपये लिटरने मिळत होते. मात्र याचा दर तीन पट वाढवून तब्बल ६२ रुपये प्रति लिटर जाहीर करण्यात आला आहे. यामुळे ही संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. शासन एकीकडे गॅस टंचाईची तीव्रता कमी व्हावी व नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी रॉकेल वितरणाचा निर्णय घेतल्याची टीमकी वाजवली जात आहे. दुसरीकडे मात्र तीनपट भाव वाढ करुन नफेखोरी केली जात आहे. यामुळे मायबाप सरकारला लोकांना दिलासा द्यायचा आहे की, व्यापाऱ्या प्रमाणे संधी मानून नफा कमावला जात आहे.

### तीन लिटर रॉकेलसाठी १८६ रुपये मोजावे लागणार?

**शासन रॉकेल पुरवठ्यातून गोरगरिबांच्या डोक्यावर उपकाराचा हात ठेवत असलातरी दुसऱ्या बाजूने प्रति लिटर ६२ रुपये भाव जाहीर केल्याने एकावेळी तीन लिटरसाठी १८६ रुपये मोजावे लागणार आहेत. यामुळे ही रक्कम काही गरिबांसाठी देणं शक्य होईल का? याबाबत शंका उपस्थित केली जात आहे.**

### काळाबाजार वाढण्याची भीती

दर जास्त असून, ग्रामीण भागात आजही काम करायचं आणि त्यावर गुजराण करायची अशी परिस्थिती आहे. यामुळे त्यांच्या हाती काही रक्कम शिल्लक रहात नाही असे चित्र आहे. यामुळे बरेच जण रॉकेल उचलू शकत नाही. हे शिल्लक रॉकेल काळ्या बाजारात जाऊन विक्री होण्याची भीती ही व्यक्त केली जात आहे.

# मुस्लिम आरक्षण मोर्चाला आ.संदीप भैय्यांचा पाठिंबा

## ▪ सर्वसमावेशक विकासासाठी आवाज उठवू : संदीप क्षीरसागर



**बीड । किसान न्युज**

**जिल्हाधिकारी कार्यालयावर येत्या शुक्रवारी (दि.१७) मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाला राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीडचे आ. संदीप क्षीरसागर यांनी पाठिंबा जाहीर केला. यावेळी त्यांनी राज्यातील प्रत्येक समाज आणि घटकाचा विकास होणं आवश्यक आहे. सर्वसमावेशक विकास हे लोकशाहीचे खरे मुल्य आहे. यामुळे सर्वसमावेशक विकासासाठी आवाज उठवू असे ही आ. क्षीरसागर यांनी सांगितले आहे.**

मुस्लिम आरक्षण कृती समिती, सप्तरंग प्रतिष्ठानच्या वतीने मुस्लिम आरक्षणासाठी मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाला अनेकांचा पाठिंबा मिळत असून, बीडचे आ. संदीप क्षीरसागर यांनी आज पत्र देऊन पाठिंबा जाहीर केला आहे. यावेळी ते म्हणाले की, भारतीय संविधानाने दिलेल्या समानतेच्या अधिकारानुसार समाजातील आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागे असलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणणे ही काळाची गरज आहे. सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकास हेच आपल्या लोकशाहीचे खरे मूल्य आहे. २०१४ पूर्वी महाराष्ट्रातील कॉंग्रेस - राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या लोकशाही आघाडी सरकारने मुस्लिम समाजाला ५% आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. मात्र, त्यानंतर सत्तेत आलेल्या भाजपा सरकारने हा निर्णय रद्द केला. यामुळे मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक प्रगतीवर मोठा परिणाम झाला. आजही मुस्लिम समाज अनेक स्तरांवर मागे आहे. त्यामुळे सध्याच्या महायुती सरकारने संवेदनशीलता दाखवून मुस्लिम समाजाला न्याय्य आरक्षण देऊन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणावे, ही ठाम मागणी आहे. मुस्लिम समाजाला आरक्षण मिळावे या न्याय्य मागणीसाठी दिनांक १७ एप्रिल रोजी बीड शहरात मुस्लिम बांधवांकडून भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या आंदोलनाला माझा पूर्ण पाठिंबा असल्याचे यावेळी कृती समितीला आ. संदीप क्षीरसागर यांनी सांगत पाठिंबा जाहीर केला आहे.

# छाया पांचाळ मृत्यू प्रकरणी शोले स्टाईल आंदोलन

## मयत महिलेचे कुटुंब चढले जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीवर



**बीड । किसान न्युज**

जिल्हा रुग्णालयात डॉक्टर व नर्सच्या हलगर्जीपणामुळे छाया पांचाळ या महिलेचा मृत्यू झाला होता. यातील दोषी मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे करण्यात आली होती. अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याने संतप्त मयत महिलेचे कुटुंब व किसकिंदा पांचाळ या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीवर चढून शोले स्टाईल आंदोलन करीत आहेत. यामुळे याप्रकरणी कारवाई होणार का? याकडे लक्ष लागले आहे. वर्षभरापूर्वी प्रसुतीदरम्यान छाया गणेश पांचाळ यांचा अतिरक्तस्त्रावामुळे मृत्यू झाला. कुटुंबीयांच्या आरोपानुसार, डॉक्टर व नर्स यांच्या हलगर्जीपणामुळे वेळेत योग्य उपचार न मिळाल्याने हा मृत्यू झाला. या प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला. मात्र संबंधितांवर ठोस कारवाई न करता केवळ औपचारिक कारवाई करून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. शस्त्रक्रिया परिचर वर्ग-४ कर्मचारी रेखा पवळे यांना निलंबित करून इतर जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांना वाचविण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. दरम्यान, उपसंचालक आरोग्य सेवा, लातूर परिमंडळ कार्यालयाने नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालात दहा मुद्द्यांवर डॉक्टर, नर्स व संबंधित कर्मचाऱ्यांना दोषी ठरवण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. तरीही कारवाई नाही. यामुळे दोन दिवसांत याबाबत दोषींवर कारवाई » पान २ वर

# शहरातील चांदणी चौकात रसवंती चालकावर हल्ला; एक गंभीर जखमी



**बीड । किसान न्युज**

शहरातील चांदणी चौक परिसरात किरकोळ कारणावरून वाद होऊन रसवंती चालकावर मारहाण केल्याची घटना घडली आहे. चांदणी चौक येथे शेख फिरदौस शेख साहेबलाल वय ४० वर्षे हे आपल्या दोन भाऊ शेख इसाख शेख साहेबलाल ३८ वर्ष व शेख फिरोज शेख साहेबलाल वय ४१ यांच्यासह रसवंती चालवीत आहे काल सायंकाळी सहा च्या सुमारास तेथे अय्युब अकबर पठाण, अल्ताफ अय्यूब पठाण, सोनू खाजा पठाण, अफरोज खाजा पठाण हे व अन्य दोन जण आले रस मागितलं रस पिऊन झाल्यानंतर त्यांना पैसे मागितले असता रसाचे पैसे का मागत आहेस? या कारणावरून रसवंती चालक शेख फिरदौस, शेख इसाक व शेख फिरोज यांना बेदम मारहाण केली व समोर आली आहे. या मारहाणीत शेख फिरदौस हे गंभीर जखमी असून त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू असून संबंधितांचे जबाब नोंदविण्याचे काम सुरू आहे. पुढील तपास सुरू आहे.

# बुद्ध विहारात धम्माचे संस्कार करून आदर्श

## समाज निर्माण करा: पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो

## भव्य रॅली काढून पालवन चौक येथे बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा





**बीड । किसान न्युज**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धर्मातरांची घोषणा करून १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपुर ममुक्कामी तथागत बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन दया, क्षमा, शांती, करुणा व मैत्रीचा संदेश देणारा तथागतांचा धम्म दिला. तथागताच्या सद धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी सम्यक सम्बुद्ध जयंती औचित्य साधून दि.१३ एप्रिल सोमवार रोजी बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणा व अनावरण सोहळ्यास पुज्य भिक्खु डॉ. इंदवंस्स महाथेरो (छ. संभाजीनगर), पुज्या भिक्खु धम्मशील थेरो (महाविहार धम्मभूमी शिवणी),पूज्य भिक्खु अश्वजित (छ. संभाजीनगर), पुज्य भिक्खु सुमेधबोधी (छ. संभाजीनगर) पुज्य भद्रेय (छ संभाजीनगर) यांच्या प्रमुख उपस्थितीत पालवन चौकापासून नागसेन बुद्ध विहारापर्यंत भव्य मिरवणूक काढून बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली.पूज्य भिक्खु यांच्या वतीने उपासक-उपासिका यांना धम्मदेसना देण्यात आली. बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापणा प्रसंगी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, प्रा.प्रदीप रोडे, सुशिलाताई मोराळे, भगवान कांडेकर, » पान २ वर

## क्रांतिसूर्य महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त

# मोरया रनर्स ग्रुपकडून १० कि.मी अभिवादन दौड




### • अभिवादन दौड मधून आरोग्य संदेश व महापुरुषांच्या विचारांचा जागर : अमर नाईकवाडे

**बीड । किसान न्युज**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात मोरया रनर्स ग्रुप, बीड यांच्या वतीने रविवार दिनांक १२ एप्रिल रोजी १० किलोमीटर अभिवादन दौडचे आयोजन करण्यात आले होते. या अभिवादन दौड मध्ये सहभागी धावपटूंनी उत्साहपूर्ण वातावरणात दहा किलोमीटरचे अंतर पूर्ण करत महापुरुषांना अभिवादन केले. सामाजिक समता, शिक्षण आणि मानवमुक्तीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या व चांगलं आरोग्य राखण्याच्या उद्देशाने या दौडीचे आयोजन करण्यात आले होते. सदर अभिवादन दौडीला शहरातील विविध क्षेत्रातील युवक धावपटूंनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. धावपटूंनी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करून समाजात बंधुता, समानता आणि शिक्षणाचा संदेश देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला. दहा किलोमीटर अभिवादन दौड मध्ये अमर नाईकवाडे, कपूर अग्रवाल, रमेश सेठ तापडिया, वैजनाथ फुटाणे, प्रदीप घोलप, सागर खांडे, स्वराज घोलप, अक्षय बाफना, अंगद नवले, रवी राऊत, पवन धूत, अशोक मुंडे, महेश लड्डा, दत्ता गाडे, गोपाल म्हात्रे, अक्षय राजमाने, ऋषिकेश सोहनी, अजय लड्डा, विलास खवले, कृष्णा कासट, गोपाल मुंदडा, स्वप्निल देशमुख, सुधीर जोशी, रजत काळे, मयूर लांडे, युवराज चरखा, राजकुमार मालपाणी, संकेत टवानी, » पान २ वर

### ९ वर्षाच्या स्वराज ने १० किलोमीटर दौड पूर्ण केली



**अवघ्या नऊ वर्षाच्या स्वराज जीवन घोलप याने अभिवादन दौडमध्ये सहभाग नोंदवत १० किलोमीटरचे अंतर पूर्ण करून महापुरुषांना अभिवादन केले. त्याबद्दल त्याचे मोरया रनर्स ग्रुप तर्फे अभिनंदन करण्यात आले.**

# उन्हाळी पिकांसाठी मांजरातून आवर्तन सोडले पाच तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**केज । किसान न्युज**

तालुक्यातील मांजरा धरणातून उन्हाळी पिकांसाठी पाण्याचे आवर्तन सोडले असून, यामुळे पाच तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेष ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरले असल्याने या निर्णयामुळे शेतकरी समाधान व्यक्त करीत आहेत. मांजरा धरणाच्या डाव्या आणि उजव्या कालव्यांतून उन्हाळी पिकांसाठी पाण्याचे आवर्तन सोडण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय कालवा सल्लागार समितीने घेतला आहे. दि. ११ एप्रिलपासून सुरू झालेले हे पाणी पुढील पंधरा दिवस सोडले जाणार असून याचा थेट लाभ केज, अंबाजोगाई, रेणापूर, लातूर आणि कळंब या पाच तालुक्यांतील १८ हजार हेक्टर क्षेत्राला मिळणार आहे. मांजरा धरणात सध्या ५९.८१ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असल्याने ऊस आणि भाजीपाला पिकांचे नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला. या निर्णयामुळे ऐन उन्हाळ्यात पाण्याची टंचाई भासणाऱ्या भागात पिकांना जीवदान मिळणार असून परिसरातील ६३ गावांच्या » पान २ वर

स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
✆ 9850643058
सोने २४ कॅरेट 151,500
२२ कॅरेट 145,000
चांदी प्रतिकिलो 244,000

# अज्ञात व्यक्तीकडून नाळवंडीत महात्मा फुले चौकाची स्थापना



**बीड । किसान न्युज**

तालुक्यातील नाळवंडी बसस्थानक परिसरामध्ये १० एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा चौक स्थापन केला. या चौकात महात्मा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. नाळवंडी बसस्थानक परिसरात क्रांतीसुर्य महात्मा फुले चौक आशा आशयाचा फलक लावण्यात आला आहे. तसेच ११ एप्रिल रोजी ध्वजारोहण करून फुले जयंती साजरी करण्यात आली. यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना ग्रामस्थांनी हे चौक गावासाठी गावपणाला वेगळे वळण लावेल असे म्हटले आहे.

# शेतीच्या वादातून राडा

## शेतकऱ्याचा खून; दोन आरोपी अटक



**गेवराई । किसान न्युज**

तालुक्यातील गौंडगाव शिवारात जमिनीच्या किरकोळ वादातून एका ५७ वर्षीय शेतकऱ्याची काठ्या आणि दगडाने मारहाण करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अर्जुन साहेबराव माळी असे मृत शेतकऱ्याचे नाव असून, या प्रकरणी गेवराई पोलिसांनी एकाच कुटुंबातील तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (१), ३(५) आणि ३५२ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. ही थरारक घटना शनिवारी (दि ११) सायंकाळी सहाच्या सुमारास घडली असून या घटनेमुळे रामनगर तांडा परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत अर्जुन माळी यांनी गौंडगाव शिवारातील शेत गट क्रमांक १५५ मधील गायरान जमिनीचा काही हिस्सा मशागतीसाठी ताब्यात घेतला होता. या जमिनीच्या उत्तर दिशेला आरोपी मधुकर नायबा शिंदे यांची मालकीची शेतजमीन आहे. घटनेच्या दिवशी सायंकाळी पाचच्या सुमारास अर्जुन माळी हे आपल्या शेतात फेरफटका मारण्यासाठी गेले होते. त्याच » पान २ वर

# मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चाला विविध सामाजिक संघटना चा वाढता पाठिंबा



**बीड । किसान न्युज**

मुस्लिम समाजासाठी लागू असलेले ५ टक्के आरक्षण रद्द केल्याच्या निषेधार्थ येत्या १७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या एल्गार मोर्चाला विविध संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांकडून पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या सह जिल्हाधिकारी, बीड यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना लेखी निवेदन सादर करून या मोर्चाला जाहीर पाठिंबा दिला. तसेच मुस्लिम समाजाच्या न्याय मागण्यांसाठी आयोजित या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, » पान २ वर